दै. मराठवाडा नेता दि. 13.03.2025

# शहरातील विविध पोलिस ठाण्याच्या हद्दीतून
# मोटारसायकल चोरणाऱ्या आरोपींकडून ५ मोटारसायकल जप्त

नांदेड : (म नेता)



शहरातील विविध पोलिस ठाण्याच्या हद्दीतून मोटारसायकल चोरी करणाऱ्या एका आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी पकडले असून त्यांच्याकडून चोरीच्या पाच मोटारसायकल जप्त केल्या आहेत. अधिक तपासासाठी सदर आरोपीला नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस उपनिरीक्षक साईनाथ पुयड व त्यांचे सहकारी हे गुन्ह्यातील तपासातील आरोपींचा शोध घेत असताना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, विष्णुपुरी येथील डॉ शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयातून मोटारसायकल चोरी करणारा आरोपी जकात नाका ते असदवन रस्त्यावरील एका झाडाखाली बसला असल्याची गुप्त माहिती मिळाली. सदर माहिती वरिष्ठांना कळवून पोलिस उपनिरीक्षक साईनाथ पुयड व त्यांचे सहकारी हे जकात नाका ते असदवन रस्त्याकडे गेले असता लिंबाच्या झाडाखाली मोटारसायकल उभी करून बसलेल्या एका आरोपीला ताब्यात घेऊन त्यांची चौकशी केली असता सदरील आरोपी हा मुखेड तालुक्यातील कारला येथील असून त्यांचे नांव नवनाथ बालाजी वडजे असल्याचे सांगितले. विष्णुपुरी येथील डॉ शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयातून एक मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली. पोलिस उपनिरीक्षक साईनाथ पुयड व त्यांच्या सहकाऱ्यांनी अधिक चौकशी केली असता ग्रामीण, वजिराबाद, इतवारा पोलिस ठाण्याच्या हद्दीतून पाच मोटारसायकल चोरी केल्याचे सांगून त्या मोटारसायकल परत केल्या. सदरील गुन्ह्यातील अधिक तपासासाठी आरोपी नवनाथ बालाजी वडजे यास ग्रामीण पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदरील कारवाई पोलिस अधिक्षक अबिनाश कुमार, अप्पर पोलिस अधीक्षक सुरज गुरव, यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उदय खंडेराव, पोलिस उपनिरीक्षक साईनाथ पुयड व पोलिस कर्मचारी संदीप घोगरे, विलास कदम, गणेश धुमाळ, संतोष बल्लुरोड, तिरुपती तेलंग आदींनी कारवाई केली आहे.

दै. तरुण भारत दि. 13.03.2025



नांदेड- स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय व त्यांच्या पथकाने नवनाथ वडजे यास अटक केली असुन त्याच्याकडुन चोरीच्या पाच मोटारसायकली जप्त केल्या आहेत.